## <u>कि. फौजदारी प्रकरण क्र. २१०/२०२२ मधील निशाणी क्र. १ वरील आदेश</u>

प्रस्तुत अर्ज व पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन नांदुरा यांनी सादर केलेला अहवाल पाहिला. अर्जदाराने पटलावर, अपराध क्र. ५१९/२०२२ मधील छापील प्रथम खबरी अहवालाची प्रत आणि स्वतःच्या आधार ओळखपत्राची प्रत सादर केली आहे. या कागदपत्रांच्या अवलोकनार्थ अर्जदार हा जप्त असलेली ६० किलो वजनाची तूर, अंदाजे किंमत रुपये ४,२००/- (अक्षरी रुपये चार हजार दोनशे फक्त) चा मालक आहे, म्हणून तो सदर तूरीचा योग्य मागणीदार वाटतो.

२. नांदुरा पोलीस ठाणे यांनी सदर तूर नाशवंत असल्यामुळे मालकास परत देण्यास नाहरकत दर्शविलेली आहे.

३. सदर जप्त तूर पोलीस स्टेशनला पडून राहील्यास नाशवंत असल्यामुळे सदर तूरीचे नुकसान होवू शकते. अशा परिस्थितीत मा. सर्वोच्च न्यायालय यांनी **<u>सुंदरभाई देसाई -वि- गुजरात राज्य</u>**, 2002 Supp(3) SCR, 39 या निर्णयविधीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार मी अटी व शर्तींवर खालील आदेश पारित करत आहे -

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, नांदुरा यांना निर्देश देण्यात येतो की, त्यांनी अपराध क्रमांक ५१९/२०२२ मध्ये जप्त असलेली ६० किलो वजनाची तूर, अंदाजे किंमत रुपये ४,२००/- (अक्षरी रुपये चार हजार दोनशे फक्त), अर्जदार नामे महेश प्रतापराव पाऊलझगडे यांना, ₹ ३,०००/- च्या (अक्षरी रुपये तीन हजार मात्र) सुपूर्तनामावर परत करावी.

DISTRICT COURT, MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by RAVINDRA ASHOK MISAL
Date: 2022.10.20 15:57:46 +0530

नांदुरा. **(आर.ए. मिसाळ)**
दिनांक – २०/१०/२०२२. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, नांदुरा

- - - - -

मी खात्रीपूर्वक असे कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेश हे मूळ आदेशाप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | :- | यो.सु. मुळे. |
| न्यायालयाचे नांव | :- | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, यांचे न्यायालय नांदुरा. |
| पिठासिन अधिकारी यांनी सही केल्याचा दिनांक | :- | २०/१०/२०२२. |
| आदेश अपलोड केल्याचा दिनांक | :- | २०/१०/२०२२. |